सोलापूर विद्यापीठ
सोलापूर पुणे महामार्ग, केगांव,
सोलापूर - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
website: http://su.digitaluniversity.ac

SOLAPUR UNIVERSITY
Solapur Pune National Highway, Kegaon,
Solapur - 413 255 (Maharashtra)
EPABX: 0217-2744763, 66,67 Ext-124
Email : bcudsu@gmail.com

**Ref. No. : SUS/BCUD/PGBUTR/2014-15/** 9226 **Date:** 18 DEC 2014

# परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य / मा. संचालक
सर्व संलंग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**विषय** - पदव्युत्तर अध्यापकास मान्यतेबाबत (P.G. Teacher / Ph.D. Guideship).

महोदय,

महाविद्यालयातील विद्यापीठ निवड समितीमार्फत नियुक्त झालेल्या पदवी अभ्यासक्रमाच्या शिक्षकास पदव्युत्तर शिक्षक (P.G.Teacher) व संशोधक मार्गदर्शक (पीएच.डी. मार्गदर्शक) म्हणून मान्यतेसाठी विविध महाविद्यालयामार्फत अर्ज सादर केले जातात. सदर अर्जाचा नमुना विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध असून सदरच्या अर्जाची फी दि. १ जानेवारी २०१५ पासून रुपये ५००/- करण्याचा विद्यापीठ अधिकार मंडळाने निर्णय घेतला आहे. सदरचे अर्ज विद्यापीठास सादर करताना खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१) अर्जाचा नमुना विद्यापीठ संकेतस्थळावरुन प्रिंट काढून सर्व रकाने पूर्णपणे भरुन आठ प्रतीमध्ये व्यवस्थित फाईलमध्ये सदर नमुन्यातच अर्ज सादर करावेत.

२) अर्जासोबत Fee रुपये ५००/- विद्यापीठ कार्यालयात रोखीने / डी.डी. ने जमा करण्यात यावी.

३) संबंधित शिक्षकास पदवी अभ्यासक्रम शिकविण्यास विद्यापीठाची नियमीत मान्यता असणे आवश्यक आहे, त्यासंदर्भातील पुरावा उदा. नियुक्ती आदेश, विद्यापीठ मान्यता पत्र व शैक्षणिक अर्हतेच्या प्रती अर्जासोबत साक्षांकित करुन जोडाव्यात.

४) अर्जातील माहिती व अनुभव याची तपासणी करुन त्याचे प्रमाणपत्र प्राचार्याच्या स्वाक्षरीने सोबत जोडावे.

५) P.G. Teacher Approval Rules प्रमाणे विद्यापीठ नियमानुसार पात्र होणा-या शिक्षकांचेच प्रस्ताव पाठविण्यात यावेत.

६) सदरचे अर्ज प्रत्येक वर्षाच्या जानेवारी व जुन या दोन महिन्यामध्येच विद्यापीठ कार्यालयात पीजी.बीयुटीआर विभागामध्ये स्विकारले जातील, तसेच या दोन महिन्याव्यतिरिक्त प्रस्ताव सादर केल्यास प्रत्येक प्रस्तावास एक हजार रुपये अधिकची फी आकारणी केली जाईल.

सदरचे परीपत्रक सर्व संबंधींत शिक्षकांच्या निदर्शनास आणून दयावे. ही विनंती.

कळावे.

आदेशान्वये

प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे
संचालक
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ

E:\shirish\PGBUTR\General Shirish.doc